## नि.क.७४ खालील आदेश
## (दि.०२/०७/२०१९)

प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांनी सदरचा अर्ज हा वादींनी कोणतीही एक दाद त्यांच्या पुराव्याच्या पुर्वी स्वीकारावी याकरीता सादर केला आहे. प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांचे वकील श्री.बी.एन.पौळ यांनी असा युक्तिवाद केला की, वादींनी सदरचा दावा हा घोषणा व कायमचे मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. तसेच, वादींनी वाटणी, वेगळा ताबा व रक्कम परत मिळण्याकरीता पर्यायी मागणी सुध्दा केलेली आहे. निशाणी क्रं.६२ अन्वये न्यायालयाने मुद्‌दा क्रं.१ आणि पर्यायी मुद्‌दा क्रं.५ हा वाटणी व वेगळया ताब्याकरीता निश्चित केला आहे. वादींनी त्यांच्या दाव्यामध्ये खरेदीखतान्वये दाद मागीतली आहे व त्यानंतर पर्यायी दाद ही वाटणीच्या अनुशंगाने मागीतली आहे. वादींना एकाच वेळी दोन्ही विवादीत आणि विसंगत असलेली दाद मागता येत नाही. बालाजीने नि.दि.दावा क्रं.२०/२००८ दाखल केला होता व त्या दाव्यात वादी क्रं.१ हा पक्षकार होता व त्याला संधी उपलब्ध असताना सुध्दा त्याने त्यात प्रतिदावा सादर करून कोणतीही दाद मागीतली नाही. वादींनी त्यांच्या वादपत्रात प्रत्येक दाद मागण्या मागचे कोणते कारण घडले होते हे नमुद केलेले नाही. त्यांनी त्यांच्या युक्तिवादाला अनुसरून मा.उच्च न्यायालय, पटना यांनी (मनन सिंग व इतर वि. लाल बदन व इतर) यात दि.१८/०१/२००६ रोजी पारीत केलेल्या न्यायनिवाडयाची प्रत सादर केली आहे. त्यांनी सदरच्या न्यायनिवाडयाच्या अनुशंगाने असा युक्तिवाद केला की, वादींना आदेश - ७ नियम - ७ दिवाणी प्रक्रिया संहिते अंतर्गत विवादीत आणि विसंगत कथनाच्या अनुशंगाने मागीतलेली दाद मान्य करता येत नाही. त्यामुळे वादींना विवादीत आणि विसंगत कथन करण्याची परवाणगी देण्यात येऊ नये व वादींना कोणतीही एक दाद स्वीकारून त्यांचा दावा चालविण्याबाबत आदेशीत करण्यात यावे. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, सदरच्या दाव्यात गुंतागूंत होऊ नये म्हणुन त्यांचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

२) वादी तर्फे श्री.व्ही.एस.शेळके वकिलांनी असा युक्तिवाद केला की, वादींनी दि.२३/०१/२०१९ रोजी त्यांचा पुरावा सादर केला आहे. वादींना त्यांच्या दाव्यात किती दाद मागावयाच्या आहेत हे त्यांनाच ठरविण्याचा अधिकार आहे. वादींनी त्यांच्या दाव्यात मागीतलेली दाद व पर्यायी दाद या त्यांनी त्यांच्या दाव्यात केलेल्या कथनाशी विवादीत आणि विसंगत नाहीत. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, आदेश - ७ नियम - ७ दिवाणी प्रक्रिया संहितेच्या अनुशंगाने वादींना त्यांच्या वादपत्रातील कथनाच्या अनुशंगाने दाद मागण्याचा पुर्ण अधिकार आहे. त्यामुळे वादींनी त्यांच्या वादपत्रात ज्या दाद मागीतल्या आहेत त्या त्यांनी त्यांच्या वादपत्रात केलेल्या कथनाशी विवादीत आणि विसंगत नाहीत. तसेच, त्यांनी असा युक्तिवाद केला की, आदेश - ७ नियम - ८ दिवाणी प्रक्रिया संहितेच्या अनुशंगाने वादींनी वेगवेगळया व विविध कारणांवर आधारलेली दाद ही त्यांच्या वादपत्राच्या कथनाच्या अनुशंगाने केलेली आहे. वरील आदेश व नियमाच्या अनुशंगाने प्रतिवादींना वादींनी मागीतलेली दाद कमी किंवा खारीज करून मागण्याचा अधिकार नाही. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, सदरचा अर्ज हा खारीज करण्यात यावा.

३) सदरचा दावा हा घोषणा व कायमचे मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. तसेच, वादींनी वाटणी, वेगळा ताबा व रक्कम परत मिळण्याकरीता पर्यायी मागणी केलेली आहे. बालाजीने नि.दि.दावा क्रं.२०/२००८ दाखल केला होता व त्यात वादी क्रं.१ हा पक्षकार असताना सुध्दा त्याने त्यात प्रतिदावा सादर करून कोणतीही दाद मागीतली नाही. त्यामुळे त्याला सदरच्या दाव्यात दाद मागता येत नाही ही बाब संयुक्तिक नाही. आदेश - ७ नियम - ७ दिवाणी प्रक्रिया संहिते अंतर्गत 'वादीला जी दाद मागावयाची असेल, ती प्रत्येक वादपत्रामध्ये स्पष्टपणे नमुद करावी लागेल - साधा असो किंवा पर्यायी म्हणुन असो आणि जो सर्वसाधारण किंवा अन्य प्रकारची दाद मागीतलेलीच आहे असे समजुन तितक्याच मर्यादीपर्यंत, न्यायालयास, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे नेहमी देता येतो अशा प्रकारची दाद मिळण्याची मागणी करण्याची आवश्यकता असणार नाही आणि प्रतिवादीने त्याच्या लेखी प्रतिवादपत्रास जी कोणतीही दाद मागीतली असेल, त्याला हाच नियम लागु होईल'. त्यामुळे वादींना त्यांच्या दाव्याच्या कथनाच्या अनुशंगाने कोणती दाद

प्रतिवादी विरूध्द मागायची आहे याची निवड करण्याचा त्यांना पुर्ण अधिकार आहेत. माझ्या पुर्वीच्या पिठासीन अधिकारी यांनी निशाणी कं.६२ यावर मुद्दे निश्चित केलेले आहेत. तसेच, निशाणी कं.६३ यावरील आदेशान्वये निशाणी कं.६२ यावर तीन अतिरिक्त मुद्दे निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे वादींनी त्यांच्या कथनाच्या अनुशंगाने विवादीत आणि विसंगत असलेली दाद मागीतली आहे किंवा नाही ही बाब सध्याच्या स्थितीत पुराव्याअभावी ठरविता येणार नाही. प्रतिवादी कं.१ ते ५ यांनी सादर केलेल्या वरील न्यायनिवाडयातील गुणोत्तर हे या प्रकरणाला लागू पडत नाही कारण सदरच्या प्रकरणात उपस्थित झालेले मुद्दे हे त्या प्रकरणात उपस्थित झालेल्या मुद्दयांपेक्षा वेगळे आहेत. त्यामुळे वादींना त्यांच्या पुराव्याच्या पुर्वी कोणतीही एक दाद स्वीकारावी याबाबत सध्याच्या स्थितीत आदेशीत करणे योग्य होणार नाही. करीता, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

अहमदपूर.
दिनांक : ०२/०७/२०१९.

(अ.रा.सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
अहमदपूर

Certified that PDF copy of Order supra is word-to-word identical to the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | A.S.Kodgire |
| Dictated on | : | 02.07.2019 |
| Checked on | : | 02.07.2019 |
| Signed on | : | 02.07.2019 |
| Uploaded on | : | 03.07.2019 |